औरंगाबाद गृहनिर्माण व क्षेत्रविकास मंडळाच्या दिनांक २.१०.९१ रोजी झालेल्या ६७ व्या सभेचा कार्यवृत्तांत.

=-=-=-=-=-=-=-=-=- =-=-=-=-=-=-=-=-=-=-=-=-=-=-=-=-=-=-=-=-=-=-=-=-

सभेस खालील पदाधिकारी उपस्थित होते.

| | |
|---|---|
| १] मा. श्री. ईश्वर भोसीकर | सभापती औरंगाबाद मंडळ |
| २] श्री. अरविंद महाजन | उपसभापती औरंगाबाद मंडळ |
| ३] श्री. व्यंकटराव देशपांडे उर्फ बबरु चारठाणकर | सदस्य |
| ४] श्री. दै. हि. मून, उपसंचालक, नगररचना व मुल्यनिर्धारण विभाग औरंगाबाद. | सदस्य |
| ५. श्री. राजभोज, [कार्यकारी अभियंता] आयुक्त महानगरपालिका औरंगाबाद यांचे | सदस्य प्रतिनिधी. |

विषय:- दिनांक ४.९.१९९१ रोजी झालेल्या ६६ व्या विशेष बैठकीचा कार्यवृत्तांत कायम करणे.

६६ व्या बैठकीतील विषय क्र.२ व ठराव क्र.३९२ वर चर्चा करतांना महानगरपालिका, नासिक यांनी आता अधिक रकमेची मागणी केली आहे अशी माहिती उपसभापतींनी दिली असता मा. सभापती यांनी महानगरपालिका नासिक यांस रु २ लाख द्यावेत व रु .२ लाख पाठवित आहे काम सुरु करावे असे महानगरपालिकेस कळवावे, अशी सूचना केली व ती सर्व सदस्यांनी मान्य केली.

ठराव क्र.४००

मंडळाच्या ६६ व्या विशेष बैठकीचा वृत्तांत वाचून दाखविण्यात आला व नंतर कायम करण्यांत आला.

६६ व्या बैठकीतील विषय क्र.२ व ठराव क्र.३९२ वर वरील प्रमाणे निर्णय झाला.

.....२

विषय क्र. २: औरंगाबाद गृहनिर्माण मंडळाकरिता औरंगाबाद येथे बांधावयाच्या प्रशासकीय इमारतीच्या बांधकामासाठी प्राप्त झालेल्या निविदावर निर्णय घेणेबाबत.

ठराव क्र. ४०१

या विषयावर सविस्तर चर्चा होऊन मंडळाने असा निर्णय घेतला की, मे. लक्ष्मी कन्स्ट्रक्शन कंपनी सोलापूर यांनी वाटाघाटीद्वारे कमी केलेली अंदाजीत किंमतीच्या १२.५% जादा दराने असलेली निविदा मंजूर करण्यांत आली.

विषय क्र. ३.: सातपूर नाशिक येथील उर्वरीत जमिनीवर उच्च उत्पन्न गटातील ३५ गाळे बांधकामासाठी प्राप्त झालेल्या निविदेवर निर्णय घेणेबाबत.

या विषयावर चर्चा करतांना उपसभापतींनी माहिती दिली की, नाशिक येथे झालेल्या मंडळाच्या बैठकीत ठरल्याप्रमाणे मे. ए. एल. पवार आणि कंपनी यांनीं त्यांचे दिनांक ६.९.९१ च्या पत्रान्वये, त्यांनी पुर्वी भरलेल्या २३.३२ टक्के जादा दराची निविदा तीन टक्क्यांनी कमी म्हणजे २०.३२ टक्के जादा दराने करण्यास तयार आहेत.

यावर मंडळाचे सदस्य श्री. व्यंकटराव देशपांडे यांनी अशी सूचना केली की, आता कुंभमेळ्याचे काम संपलेले आहे. परत निविदा बोलविल्यास कमी दराच्या निविदा प्राप्त होऊ शकतील.

ठराव क्र. ४०२-

या विषयावर चर्चा होऊन मंडळाने फेरनिविदा बोलविण्याचा निर्णय घेतला.

विषय क्र. ४ :- एकनाथनगर औरंगाबाद येथील उच्च उत्पन्न गटान्तर्गत १० गाळे व ४ दुकाने असलेल्या योजनेबाबत.

ठराव क्र. ४०३

या विषयावर चर्चा करतांना मंडळाने सर्वानुमते असा निर्णय घेतला की, एकनाथनगर या वसाहतीमधील ५६२.३८ चौ. मी या भूखंडाच्या विक्रीसाठी निविदा बोलावून निवास व वाणिज्य अशा मिश्र उपयोगाकरिता हा भूखंड विकण्यांत यावा.

विषय क्र. ५: चाळीसगांव नगरपालिका जि.जळगांव यांचेकडून आलेल्या झोपडपट्टी सुधारणा कामांच्या प्रस्ताव प्रशासकीय मान्यता प्रदान करणेबाबत.

या विषयावर चर्चा करतांना उपसभापती यांनी मंडळास माहिती दिली की, चाळीसगांव नगरपालिकेने त्यांचे पत्र क्र. ११६५ दि. २४.९.९१ अन्वये अनिलनगर या झोपडपट्टीतील सुधारणा कामांना प्रशासकीय मान्यता प्रदान करण्यासाठी प्रस्ताव पाठविला आहे.

जळगांव जिल्हयासाठी सन १९९१-९२ या वर्षामध्ये सदर योजनेसाठी ९.८७ लक्ष रूपयाची तरतुद असून त्यापैकी चाळीसगांव शहरासाठी १.०० लक्ष रूपयाची तरतुद प्रस्तावित आहे.आता पर्यन्त या कार्यक्रमावरील नगरपालिकेचा खर्च ०.३० लक्ष झाला असून ०.७० लक्ष रूपये शिल्लक असल्याची माहिती देण्यांत आली.

ठराव क्र. ४०४

या विषयावर सविस्तर चर्चा होऊन चाळीसगांव नगरपालिकेने पाठविलेल्या अनिलनगर या झोपडपट्टी सुधारणेच्या प्रस्तावास रू. १,५०,०००/- मंडळाने मंजूरी प्रदान केली.

विषय क्र.६: मालेगांव येथील मंडळाच्या जमिनीवर बांधलेले गोदाम डॉ.बळीराम हिरे यांच्या विनंतीनुसार वाटप करण्याबाबत.

---

या विषयावर चर्चा करतांना मा.सभापती यांनी असे आदेश दिले की, मालेगांव येथील वसाहतीत बालवाडी,अरबी मद्रसा आहे का त्याची चौकशी करावी.तेथे कार्यरत असलेल्या संस्थेलाच प्रथम प्राधान्य देणे आवश्यक आहे.तेथे इतर कांही संस्था कार्यरत आहेत काय हे पहावे त्यानुसार त्याची मागणी आहे कांय हे प्रथम तपासावे, व नंतरच हा प्रस्ताव मंडळापुढे ठेवावा.

ठराव क्र.४०५.

मा.सभापती यांच्या सुचनेनुसार चौकशी करून अहवाल मंडळासमोर ठेवावा असा निर्णय मंडळाने घेतला.

विषय क्र.७:- मा.सभापतीच्या परवानगीने आयत्यावेळेस येणारे विषय.

---

[१] बीड नगरपालिका यांचेकडून आलेल्या झोपडपट्टी सुधारणा कामांच्या प्रस्तावास प्रशासकीय मान्यता प्रदान करणेबाबत.

---

या विषयावर चर्चा करतांना उपसभापतींनी मंडळास माहिती दिली की, बीडनगरपरिषदेने सुभाषनगर या झोपडपट्टीतील सुधारणा कामांना प्रशासकीय मान्यता प्रदान करण्यासाठी प्रस्ताव पाठविला आहे. सदर कामाची अंदाजपत्रके ८,३९,४५३/-रुपयाची आहे.

बीड जिल्ह्यासाठी सन १९९१-९२ वर्षामध्ये सदर योजनेसाठी १२.३४ लक्ष रुपयांची तरतुद आहे.आतापर्यंन्त या कार्यक्रमावरील नगरपालिकेचा खर्च रु. ८.४० लक्ष झाला असुन ३.९४ लक्ष रुपये शिल्लक आहे. बीड नगरपालिकेच्या हाती सध्या साधारणत: १८ लक्ष रुपयाची कामे आहेत.

बीड नगरपालिकेने दिनांक ७.१०.९१ रोजीच्या पत्राने असे कळविले आहे की, बीड शहरामधील सुभाषनगर या भागात सुविधांच्या अभावामुळे कावीळ व इतर साथ पसरत आहे. या भागातील साथीच्या रोगांना प्रतिबंध करण्यासाठी या भागातील सुविधांची कामे त्वरीत करणे आवश्यक आहे.

...५

तसेच बीड नगरपालिकेने प्रथमत: हा खर्च स्वत:च्या निधीतून करण्यांत येईल व मंडळाकडे निधीच्या उपलब्धतेप्रमाणे प्रतिपूर्तीची मागणी करण्यांत येईल असे कळविले असल्याने उपसभापतींनी सांगितले.

ठराव क्र. ४०६

यां विषयावर सविस्तर चर्चा होऊन मंडळाने असा निर्णय घेतला की, बीड येथील सुभाषनगर या झोपडपट्टीच्या सुधारणा कामाच्या अंदाजपत्रकास नियमाप्रमाणे रु. ७,४१,९६३/- रुपयास बीड नगरपालिकेच्या हाती असलेल्या कामांना प्राधान्य देऊन निधीच्या उपलब्धतेनुसार प्रतिपूर्ती करण्याच्या अटीवर प्रशासकीय मान्यता देण्यांत येत आहे.

सभेनंतर मा. सभापतींचे परवानगीने सभा संपली.

. . .